महाराष्ट्र शासन
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६

दूरध्वनी क्रमांक (०२०) २५६५६२३४, Web : www.ropune.org.in Email : ropune@dtemaharashtra.gov.in

जा.क्र. : तंशिविकापु/आस्था-३(अ)/विनापरवानगी अनुपस्थिती/२०२४/ 1692 दिनांक : 16 APR 2024

**तातडीचे**

प्रति,

प्राचार्य/उपसचिव,
सर्व शासकीय संस्था/कार्यालये.

विषय :-अनधिकृतपणे गैरहजर राहणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याविरुध्द कार्यवाही करणेबाबत---

संदर्भ :- संचालनालयाचे पत्र क्र.४अ/आस्था-२/२०२४/११९, दि. १०/०४/२०२४.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय पत्र या कार्यालयास प्राप्त झालेले आहे. त्यानुसार सर्व संस्था/कार्यालय प्रमुखांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील/कार्यालयातील वर्ग अ, ब, क व ड मध्ये कार्यरत अधिकारी/कर्मचारी विनापरवानगी अनुपस्थित राहत असतील अशा अधिकारी/कर्मचा-यांची माहिती महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक. अरजा-२०१६/प्र.क्र.८४/सेवा ६ दिनांक १० ऑक्टोंबर २०१७ मधील परिच्छेद ३ मधील विवरणामध्ये भरुन तात्काळ या कार्यालयास दिनांक १८/०४/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यत सादर करावी.

**सोबत : दिनांक १०/०४/२०२४ चे पत्र.**

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेसाठी.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन


# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४७३/४२४/४३४,

ई-मेल—desk4a@dtemaharashtra.gov.in,वेबसाईट:


क्रमांक: ४अ/आस्था-२/२०२४/११९ दिनांक: 10 APR 2024

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई, पुणे, नाशिक, अमरावती, नागपूर, छत्रपती संभाजी नगर.

विषय : अनधिकृतपणे गैरहजर राहणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याविरुद्ध कार्यवाही करण्याबाबत...

संदर्भ : ०१. वित्त विभाग, परिपत्रक क्रमांक अरजा-२०१६/प्र.क्र.८४/सेवा६, दि.१०/१०/२०१७

०२. संचालनालयाचे पत्र क्रमांक ४अ/आस्था/२०२२/३०५, दि.१३/०६/२०२२

शासकीय अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय तसेच शासकीय तंत्रनिकेतनातील अध्यापकांच्या दीर्घकालिन रजेचे प्रस्ताव मान्यतेकरिता संचालनालयास सादर करण्यात येतात.

सदर प्रस्तावांबाबत असे निदर्शनास आले आहे की, दीर्घकालिन रजेचे प्रस्ताव रजा संपुष्टात आल्यानंतर किंवा संबंधित कर्मचारी रुजू झाल्या नंतर विलंबाने कार्योत्तर मान्यतेसाठी सादर करण्यात येतात. अशा कर्मचाऱ्यांच्या दीर्घकालिन अनुपस्थितीबाबत शासनास अवगत करणे शक्य होत नाही. अध्यापकांच्या वारंवार, दीर्घकाळ अनुपस्थितीमुळे शैक्षणिक तसेच प्रशासकीय कामकाजावर प्रतिकूल परिणाम होतो. तसेच विनापरवानगी रजा घेण्याची प्रवृत्ती वाढत असल्याचे दिसून येते.

संदर्भाधिन शासन परिपत्रकात अनुधिकृतपणे गैरहजर राहणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याविरुद्ध कार्यवाही करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. सदर शासन निर्णयातील तरतूदीनुसार विनापरवानगी अनुपस्थित असणाऱ्या कर्मचाऱ्यांवर उचित कार्यवाही करण्यात यावी. तसेच सदर शासन परिपत्रकातील परिच्छेद ३ मध्ये नमूद विवरणपत्रात अनुधिकृतपणे अनुपस्थित असलेल्या अध्यापकांची माहिती पदवी व पदविका संस्थानिहाय स्वतंत्रपणे सादर करावी. सदर माहिती सादर करताना संबंधितांवर आपल्यास्तरावरुन केलेल्या कार्यवाहीची सुद्धा माहिती सादर करावी. सदर माहिती दि.१८/०४/२०२४ पर्यंत विनाविलंब सादर करावी.

(डॉ. विनोद म. मोहितकर)

संचालक,

तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

3790